बुधवार दि.१७ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २३६
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

## सातारा लोकसभा मतदारसंघातून अखेर

# छत्रपती उदयनराजे भोसले यांना भारतीय जनता पक्षाच्या वतीने उमेदवारी जाहीर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सातारा (वृत्तसंस्था)**

राज्यात सर्वाधिक चर्चेत असलेल्या सातारा लोकसभा मतदारसंघातून अखेर छत्रपती उदयनराजे भोसले यांना भारतीय जनता पक्षाच्या वतीने उमेदवारी जाहीर झाली आहे. भारतीय जनता पक्षाने आज काही उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. यामध्ये महाराष्ट्रातील एका नावाचा समावेश आहे. यामध्ये छत्रपती उदयनराजे भोसले यांना सातारा लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. वास्तविक उमेदवारी जाहीर होण्याआधीच उदयनराजे भोसले यांनी आपल्या प्रचाराला सुरुवात केली होती. सातारा लोकसभा मतदारसंघातून आपणच महायुतीचे उमेदवार असेल, असा दावा देखील त्यांनी केला होता. त्यामुळे अपेक्षेप्रमाणे त्यांच्या नावाची आज घोषणा करण्यात आली.



सातारा लोकसभा मतदारसंघांमध्ये आता उदयनराजे भोसले यांची थेट लढत महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्यासोबत होणार आहे. शशिकांत शिंदे हे शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तुतारी या चिन्हावर निवडणूक लढवत आहेत. या मतदारसंघातील विद्यमान खासदार देखील शरद पवार गटाचे असून त्यांनी यावेळी आरोग्याचे कारण देत निवडणुकीत उभे राहणार नसल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे शरद पवार गटाच्या वतीने शशिकांत शिंदे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.सातारा लोकसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाकडून आपण लढवण्यास इच्छुक असल्याचे खासदार उदयनराजे भोसले यांनी आधीच जाहीर केले होते. त्यासाठी त्यांनी दिल्लीत चार दिवस तळ देखील ठोकला होता. दिल्लीतून परतल्यानंतर आपल्यालाच उमेदवारी मिळाली असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. मात्र, भारतीय जनता पक्षाच्या वतीने अद्याप त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नव्हती.वास्तविक महायुतीमध्ये सातारा लोकसभा मतदारसंघ अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे होता. मात्र, असे असताना उदयनराजे भोसले यांच्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ही जागा सोडण्यास तयार असल्याचे बोलले जात होते. मात्र, त्या बदल्यात नाशिक लोकसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला देण्याची तयारी भाजपने दाखवली आहे. मात्र नाशिक लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आहे. त्यामुळे या जागे संदर्भात पेच निर्माण झाला होता. मात्र, आता उदयनराजे भोसले यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

## भारत देशाचे भाग्यविधाते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर-वंचित नेते नागवंशी,संघपाल पनाड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

सुलतानपूर येथे मोठ्या हर्षउल्हासामध्ये भीम जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सकाळी १०: वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून. माता रमाई महिला मंडळ यांनी उपस्थितांना त्रिशरण पंचशील दिले. या वेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर मान्यवर मंडळींनी प्रकाश टाकला त्यामध्ये नागवंशी संघपाल पनाड, महेंद्र पनाड, जमादार कटक साहेब, श्याम राऊत, राहुल अवसरमोल,प्रसेंजित पनाड, या वेळी उपस्थित अनित्य घेवंदे, अशोक जावळे, वामणराव झोरे, डॉ देसाई, वसंत जुमडे,रमेश भानापूरे,भानुदास पवार,सुखदेवराव देसाई, पारीख सर,साई दुबे,तबारक भाई,काव्हरके साहेब, प्राचार्य धांडे सर्व शिक्षक वृंद, प्राचार्य सोळंके सर्व शिक्षक वृंद, पाटील सर, पद्मने सर, दूशितवार सर, बावस्कर सर, श्रीराम पनाड,मनोहर पनाड,बबन पनाड, सुरेश पनाड, नागसेन पनाड, दादाराव पनाड,नामदेव पनाड,अवसरमोल सर,प्रल्हाद मोरे, निवृत्ती आनंदराव, राजेश पाटील,उप सरपंच सुखदेव झोरे,संतोष पाटील, संतोष शिंदे,शेख अमीर भाई, जाकिर पठाण, शे.अजहर भाई,गोपाल भानापुरे, वैभव टकले, सद्दाम भाई, शंकर निलक, दीपक राजगुरू, ज्ञानेश्वर हरकळ, अनंथा टकले,भारत पनाड,सागर निर्मळे तथा पत्रकार बांधव उपस्थित होते.दुपारी ४: वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची भव्य रथ सजवून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी मिरवणूक मार्गाने गावकऱ्यांनी रांगोळी काढून मिरवणुकीचे स्वागत केले. छत्रपती शिवाजी महाराज उत्सव समिती च्या वतीने व गावकऱ्यांच्या वतीने अनेक ठिकाणी चहा पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी

नागवंशी, संघपाल पनाड यांच्या मार्गदर्शनाखाली. भीम योध्दा गृप व माता रमाई महिला मंडळ, मनोहर आनंदा पनाड, अतिष पनाड,बिंबिसार पनाड, सिद्धोधन सरदार, विशाल पनाड ,राजहंस जावळे, संजय शेजुळ, प्रदीप मोरे, परसराम,जावळे,महेश मोरे, संदेश पनाड,महेंद्र मधूकर पनाड, पारस पनाड,किरण पनाड,अकाश घेवंदे, भुषण जावळे, बाजीराव गवई,समस्त समाज बांधवांनी परिश्रम घेतले. यावेळी पोलीस प्रशासनाचे कटक साहेब,जाधवसाहेब,नागरे साहेब यानी चोक पोलीस बंदोबस्त ठेवला..



## अनेक दिवसापासून थैमान घातलेल्या वानरास अखेर वन विभागाने केले बंदिस्त



लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

मागील काही दिवसापासून शहरातील गल्ली गल्ली मध्ये या पिसाळलेल्या वानराने हैदोस घातला होता व अनेकांना जाऊन जखमी केले होते त्यामध्ये इंदिरानगर लिंबोणी गल्ली कलाल पेठ देऊळ गल्ली येथील नागरिकांचा चावा घेऊन त्यांना जखमी केले होते दिनांक १६ रोजी संध्याकाळी सहाच्या सुमारास एका इसमाला चावा घेऊन त्याला जखमी केले आता त्यांची प्रगती चिंचाजनक आहे वनविभागाकडून सापळा रचून दिनांक १७ रोजी सकाळी पाचच्या सुमारास या वानरास पकडण्यात यश आले यावेळी केशव वाबळे उपवनसंरक्षक नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली भीमसिंह ठाकूर सहाय्यक वनसंरक्षक नांदेड व संदीप शिंदे वनपरिक्षेत्र अधिकारी नांदेड अशोक क्यादरवाड वनपाल लोहा वन्य जीव रक्षक अतिद्र कट्टी पी.आर घुगे वनसंरक्षक वी आर मुंडे बी पांडुरंने नामदेव पंढरी रमेश राठोड वन सेवक नारायण शेवडीकर इंगळे अविनाश वागतकर आणि मिलिंद प्रधान वाहन चालक आदी कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम करून या वानरास जेरबंद केले.

## केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना आजपासून दोन दिवसीय प्रशिक्षण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करिता केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना आजपासून दि. १५ व १६ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत असे दोन दिवसीय प्रशिक्षण गोपिका सिताराम गावंडे महाविद्यालय ढाणकी रोड उमरखेड येथे पार पडणार आहे. यामध्ये क्रपवीप ढीरळपळपस व कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट, व्हीव्हीपॅट हाताळणी, व कंट्रोल युनिट, हाताळणी आदीबाबतचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.






शेतकऱ्यांच्या व्यथा.. भायडी येथील शेतकरी गजानन पांडे शेतकऱ्याच्या मालाला भाव नसल्यामुळे शेतकऱ्याने टाकल्या गोबी मध्ये मेंढ्या शेतकरी रात्र चा दिवस आणि दिवसाची रात्र करणारा शेतकरी शेतीमध्ये जेवढा पैसा लावलेला होता तो सुद्धा निघत नसल्याने शेतकऱ्याने कंटाळून टाकल्या गोबी मध्ये मेंढ्या.. छाया लोकनेता न्यूज नेटवर्क, राम शिंदे



महाविकास आघाडीचे उमेदवार माननीय डॉक्टर कल्याणराव काळे यांची दानापूर येथे भेट... छाया लोकनेता न्यूज नेटवर्क.. राम शिंदे

## धैर्यशील मोहितेंनी साथ सोडताच फडणवीसांकडून डॅमेज कंट्रोल

**नागपूर**–माढा लोकसभा मतदारसंघ पुन्हा मिळवण्यासाठी शरद पवारांनी भाजपच्या धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हाती तुतारी देत महायुतीच्या अडचणी वाढवल्या आहेत. तर दुसरीकडे सोलापुरातील प्रसिद्ध धनगर नेते उत्तमराव जानकर मोहिते पाटील यांना पाठिंबा देण्याच्या तयारीत आहे. त्यांची नाराजी पाहता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस डॅमेज कंट्रोल करीत उत्तमराव जानकर यांना नागपुरात बोलावून घेत त्यांच्याशी तासभर चर्चा केली. फडणवीसांनी जानकर यांना नागपुरला बोलावून घेतले. त्यांच्यासाठी बारामतीला खास चार्टर्ड प्लेन पाठवण्यात आले होते.

## चारोळी

**कोण काय म्हणतो**
**हा फुकाचा विचार कशास करावा**
**संयम ठेवूनी पदोपदी**
**योग्य मार्ग हाती धरावा.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

## राज्य कार्याध्यक्ष पदी उत्तम पवार,जिल्हा उपाध्यक्ष 'अ.नगर' पदी मोहनराव खवळे तर जिल्हा कार्याध्यक्ष पदी नानासाहेब मोरे यांची निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

जि.प.प्रा.केंद्र शाळा पाटोदा ता जामखेड येथील मुख्याध्यपक श्री उत्तम पवार ( राज्यकार्यध्यक्ष),सेवानिवृत्त मुख्याध्यपक श्री.मोहनराव खवळे ( अ.नगर उपाध्यक्ष ) व नानासाहेब मोरे(जिल्हा कार्याध्यक्ष)यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदुषण निवारण मंडळाचे राज्य अध्यक्ष श्री.प्रमोद ( दादा ) मोरे यांनी त्याच्यां कार्याची दखल घेऊन निवड केली आहे.उत्तम पवार यांनी त्याच्यां शाळेत वृक्षारोपण करून जवळपास २५० झाडे जगवली आहेत.शाळेत पक्ष्यांसाठी पाणी पिण्या साठी मातीची भांडे ठेवण्यात आलेली आहेत त्याच बरोबर शेजारील शाळेत व शाळेतील मुलांना परिसरात झाडे लावण्यासाठी प्रत्येक वर्षी वृक्षरोप वाटप केली जातात.निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळा चे कार्य समाजात पोहचविण्याचे ते काम करतात.उत्तम पवार,मोहनराव खवळे व नानासाहेब मोरे यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या पदी निवडी बद्दल राज्याचे अध्यक्ष प्रमोद ( दादा ) मोरे,मंडळाचे सर्व पदाधिकारी तसेच जामखेड तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी श्री बाळासाहेब धनवे साहेब,निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदुषण निवारण मंडळाचे राज्य प्रसिद्ध प्रमुख 'पत्रकार' श्री.अण्णासाहेब साबळे व परिसरातील सर्व शिक्षक व सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातून यांचे अभिनंदन करून प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मिडिया माध्यमातून त्यांच्या निवडी बद्दल शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



## लोणार तालुक्यातील शारा येथे अज्ञात समाज कंटकाडुन निळ्या झेंड्याचा अवमान



लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

लोणार तालुक्यातील शारा येथे १५ एप्रिलच्या रात्री अज्ञात समाज कंटकाडुन निळ्या झेंड्याचा अवमान झाल्याची घटना १६, एप्रिल रोजी उघडिस आली.त्यानंतर

भीमसैनिकाकडुन तीव्र आंदोलन छेडुन तब्बल तीन तास रास्ता रोको करण्यात आले.सविस्तर वृत्त असे की

जगप्रसिद्ध लोणार सरोवर पासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या शारा येथे सर्व जाती धर्मांचे लोक राहतात.पुण्यतीथी जयंती अशा कार्यक्रमात एकमेकांना सहकार्य करतात परंतु १४ एप्रिल रोजी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गावात झेंडे लावले असताना ग्रामपंचायत जवळिल इलेक्ट्रिक पोलवर

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा असलेले झेंडे लावण्यात आले होते.१५ एप्रिल रात्री कुणीतरी अज्ञात समाज कंटकाने यातील काही झेंडे काढून कचऱ्यात फेकुन दिले.हि गंभीर बाब १६ एप्रिल रोजी सकाळी उघडकीस आली.समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्याने महिला पुरुषांनी तब्बल चार तास रास्ता रोको करून आपला रोष व्यक्त केला .घटना स्थळी पोलिसांनी धाव घेऊन समाजबांधवाना शांतता पाळण्याचे आवाहन केले आहे.या प्रकरणात अज्ञात आरोपी विरूद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून अज्ञात विटंबना करणाऱ्यां आरोपीचा शोध सुरू आहे.अशी माहिती ठाणेदार निमेष मेहेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचा पुढिल तपास सुरू आहे.

# श्रीरामाचे जीवन चरित्र दिशादर्शक १७ एप्रिल रामनवमी

लोकनेता न्यूज नेटवर्क

भगवान श्रीविष्णूचा सातवा अवतार म्हणजे श्रीराम प्रभू होय.
चैत्र महिन्यातील नवमीला दुपारी बारा वाजता त्यांचा जन्म झाला. आणि सुंठवडा वाटून पाळणा सुरू झाला.
चैत्र नवमीला श्रीराम जन्मले
सोबत खेळाया तीन बंधू आले, माता कौसल्या, कैकयी,सुमित्रा
बालकांचे कौतुक करू लागल्या
आज सर्वत्र रामनवमी उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जात आहे. त्यानिमित्ताने मर्यादा पुरूषोत्तम श्रीराम कथेची माहिती आपण येथे करून घेणार आहोत. राजा दशरथला कौसल्या, कैकयी आणि सुमित्रा ह्या तीन राण्या होत्या. त्यांना श्रीराम, भरत, लक्ष्मण,शत्रुघ्न,अशी चार मुले व एक मुलगी शांता होती. हे सर्वजण अयोध्या नगरीत आपले राज्य गुण्या गोविंदाने चालवित होते. राज्यकारभार अतिशय सुरळीत चालू होता. एके दिवशी राजा दशरथ शिकारीला निघाले त्यावेळी श्रावण बाळ त्यांच्या वृद्ध आई-वडिलांना देवदर्शनासाठी काशीला घेऊन चालले होते. एका जंगलामध्ये आई-वडिलांना तहान लागल्यामुळे पाणी आणण्या साठी ते गेले , तिथे ते पाणी भरत असताना आवाज आला, त्याच दिशेने राजा दशरथानी बाण सोडला, तो बाण श्रावण बाळाला लागल्याने तो गतप्राण झाला. त्यांच्या आई-वडिलांनी जो कोणी बाण मारला असेल त्याच्या मृत्यू समयी त्यांना पाणी पाजण्यासाठी कोणीही जवळ राहणार नाही,असा शाप दिला. तो शाप पुढील काळात खरा ठरला. राजा दशरथाचे दानवासोबत युद्ध चालू असते वेळेस त्यांच्या रथाचा एक चाक निखळला, त्यावेळेस राणी कैकयीने तिचा हात त्या रथाला लावून राजा दशरथला युद्ध जिंकून दिले. ही घटना रामायणात घडली आहे. त्यावेळेस तिने एक वर मागून घेतला, ज्यावेळेस मला हवा असेल त्यावेळेस मी तो पूर्ण करून घेणार , राजा दशरथाने आनंदाच्या भरात वचन देऊन बसले ,हीच गोष्ट पुढे त्यांना जड झाली. राजा दशरथ वार्धक्याकडे झुकत होते. त्यावेळेस आपल्या गादीचा वारस म्हणून त्यांनी प्रभू रामचंद्राला बसवण्याचा प्रयत्न करत होते. परंतु येथे मंथरा दासी आली आणि सर्व रामायण घडले. येथेच माशी शिंकली आणि श्रीरामाला १४ वर्षे वनवास व भरताला अयोध्या नगरीची गादी मिळावी,यासाठी राजा दशरथा कडे कैकयीने हट्ट धरला
,मित्रांनो राजहट्ट, स्त्री हट्ट,आणि बाल हट्ट हे पूर्ण करावेच लागतात. येथूनच रामायणाची खरी सुरुवात होते. पुढे प्रभू रामचंद्र ,सीता आणि लक्ष्मण वनवासाला निघाले, त्यांचा छोटा बंधू भरत अयोध्येच्या गादीवर बसावे, ही इच्छा कैकयीची होती, परंतु मोठा बंधू वनवासाला गेल्यानंतर त्यांच्या पादुकाचे पूजन भरतानी १४ वर्ष केले. परंतु शेवटपर्यंत बंधूच्या गादीवर ते बसले नाहीत, पिता- वचनाची करण्यास पूर्तता। वनी राहिले राम, लक्ष्मण, सीता हे आज आपल्याला समाजाला सांगायचे आहे. बंधुप्रेम काय असते? बंधूचा आदर काय असतो. मोठा बंधू हा वडीला समान, व बंधूची पत्नी ही आई समान असते
.अशी भारतीय संस्कृती आहे, ती आपणाला टिकवून तिची जोपासना करायची आहे .असा मान सर्वत्र द्यावा लागतो, म्हणूनच ही रामनवमी आपण त्या हेतूने साजरी करतो.
हा खरा मतितार्थ येथे आपणाला सांगायचे आहे. इकडे वनवासामध्ये राम,सीता, लक्ष्मण वनवास भोगत आहेत, तरी लक्ष्मणाची पत्नी उर्मिला ही स्वत: घरी आहे हे आपणाला इथं समजून घ्यायचे आहे. आजकालचा आपण जर प्रश्न पाहिला तर असं होईल का ? उर्मिला सारखं आज मन मोठे करून एवढे वर्ष कोणी त्याग करेल काय ? यासाठी आपणाला रामनवमी कडून आदर्श घ्यायचा आहे .रामराज्य काय होते. आई-वडिलांचा आदर कसा करावा. आई-वडिलांनी सांगितलेला शब्द प्रमाण मानून प्रभू रामचंद्र वनवासाला निघाले हे या ठिकाणी आपल्याला कळाले पाहिजे.
लक्ष्मण भरत आणि शत्रुघ्न
त्यांजसावे दूर करी दुष्टांचे विघ्न
आज्ञापालन गुरुंचे करणारा शिष्य सीता स्वयंवरी उचले शिवधनुष्य
राजा दशरथचा मुलगा श्रीराम त्यांच्याकडे एवढे मोठे ऐश्वर्य,सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा, पैसा, दास ,दास्या सर्व काही सोडून वनवासाला निघाले. प्रत्यक्ष वनवास



भोगणे हे सोपे नाही. जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे असे म्हणतात.
म्हणून मित्रांनो रामनवमी ही साजरी करते वेळी एक वचन, एक बाणी,एक पत्नी असणारा हा सर्वश्रेष्ठ श्रीराम आहे. श्रीराम ही एक संस्कृती आहे. प्रत्येकाच्या अंत:करणात तो आहे. रामराज्य यावे सर्व आपण आनंदाने जीवन जगावे, राम राज्यांमध्ये माणसांना त्रास नाही. कोणी लहान- मोठा नाही. अयोध्या नगरी ही जगाचे वैभव आहे.येथे राम अवतरला आहे
.त्याने दानवाचा संहार केला आहे. कपटी असणाऱ्या रावणाचा त्यांनी वध केला. कारण या ठिकाणी अपराध करणाऱ्याला क्षमा नाही. चुकीला माफी नाही. म्हणून रामायणातील श्रीराम हा मर्यादा पुरुषोत्तम राम आहे .त्याला धर्म, अर्थ ,काम, मोक्ष हे सर्व माहित आहे. त्यामुळे तो सर्वांना घेऊन चालतो. सर्वांना समानता देतो. शबरी, जटायू, सुग्रीव या सर्वांना तो घेऊन चालतो आहे, आणि हनुमंत राया सारखा सर्वश्रेष्ठ शिष्य त्याच्या सोबत आहे. आपल्या दरबारातील लोकांना सन्मानाची वागणूक देतो. तो स्वतःचा विचार न करता इतरांचा विचार करताना दिसतो. म्हणून आपण दोन व्यक्ती एकमेकांना भेटल्याबरोबर राम राम म्हणून बोलण्यास सुरुवात करतो. राम राम एकमेकांना प्रणाम करण्यासाठी हे शब्द उच्चारले जातात .राम कृष्ण हरी या शब्दांमध्ये अतिशय ताकद व शक्ती आहे .राम जप केल्यामुळे संसारातील दुःख नष्ट होतात. रामप्रहारी खोटं बोलू नये, असे जाणकार लोक सांगतात. रामाच्या राज्यामध्ये सुख, समृद्धी, शांतता होती. रामराज्य पुन्हा कधी येईल असे बोलले जाते. श्रीराम हे तिन्ही जगाचे स्वामी आहेत .स्वर्ग, मृत्यू, पाताळ मध्ये त्यांचे नेहमी गुणगान केले जातात. श्रीरामाचे स्वरूप हे अतिशय देखणे आहे. तसेच ते पराक्रमी आहेत. वनवासामध्ये १४ वर्षे राहुन फळे व कंदमुळे खाल्ले. प्राणिमात्रावर दया केली,राम हा धनुर्धारीमध्ये सर्वश्रेष्ठ आहे. त्यांनी अहिल्येचा उद्धार केला दानवांचा कर्दनकाळ ठरला. रामराज्य आले की राज्यामध्ये सगळीकडे सुख, शांती, समृद्धी लाभली. लोक नीतीने राहतात. वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवतात. कोणीही कोणावर अन्याय, अत्याचार करीत नाहीत, रामराज्ये असावे असे प्रत्येकाला वाटते .जो खरोखर खोटा आहे त्याला खोटंच म्हटलं पाहिजे. उगाच कोणाची खोटी स्तुती करू नये. भावासोबत राहते वेळेस भावाचे अधिकार भावाला द्यावेत .त्याला कमी लेखू नये, सर्वांना सोबत घेऊन चालावे. सर्वांचा समान मान ठेवावा ,
बंधुपत्नीचा ही आदर करावा.
आज लाखो भाविक भक्त अयोध्या येथे जाऊन प्रभू रामचंद्राच्या चरणाला स्पर्श करून धन्य धन्य झालो म्हणून आनंदाचे अश्रू डोळ्यात आणतात. अयोध्येतील राम मंदिराने झाली स्वप्नपूर्ती, प्रभू रामचंद्राच्या दर्शनाने जीवनात नवस्फूर्ती आता आली आहे कारण रामराज्याची आठवण आली की सध्याचा समाज आठवतो.
आज समाजामध्ये गुंडगिरी, अन्याय, अत्याचार व्याभिचार ,चोरी, लूटमार
,दहशतवाद ,नक्षलवाद वाढलेला आहे. तसेच सामाजिक परिस्थिती सुद्धा थोडी बिघडली आहे. आई-वडिलांना अनेक ठिकाणी सांभाळले जात नाही. वार्धक्यात त्यांची दुर्दशा होत आहे. आई-वडिलांमुळे भाऊ भावाच्या जीवावर उठलेला आहे . सासू आणि सुनेचे वैर जन्मोजन्मी मालिका वाले दाखवत आहेत ते प्रत्यक्षात खरे असो की नसो त्यांचा व्यवसाय चांगला चालत आहे. द्वेष, सूड, वैर निर्माण झालेले आहे .अनेक ठिकाणी भावकी मध्ये भांडण लागून लोक तुरुंगाची हवा खात आहेत. समाजात आदर्श घ्यावा असे व्यक्ती कोणी राहिले नाहीत. मोठे असणारे लोक खोटे वचने देत आहेत. आश्वासनाचा पाऊस पाडत आहेत परंतु प्रत्यक्ष कृती करताना मात्र विसरत आहेत. म्हणून परत परत राम राज्याची आठवण येते. सध्याचा मानव चंद्रावर गेला असला तरी सामाजिक दृष्ट्या तो हतबल झाला आहे. समाजाची नीतिमत्ता ढासळली आहे. कोणीच कोणाचे ऐकत नाहीत. पैसा आला परंतु माणूस वाईट गोष्टीकडे वळला.आज गावोगावी कितीतरी तरुण व्यसनी झालेले आहेत. बेरोजगारी वाढलेली आहे. नेतृत्व करणारा आश्वासनाचा पाऊस पाडून लोक बेरोजगारच ठेवत आहेत.ही सध्या वास्तविक परिस्थिती आहे. महागाईने डोके वर काढले आहे. नोक-या तर स्वप्नात सुद्धा मिळत नाहीत. पाऊस कमी होत चालला आहे .निसर्गाचे असंतुलन झाले आहे. उन्हाळ्यात ,पावसाळा पावसाळ्यात हिवाळा एकाच दिवशी ऊन लागत आहे थंडी ही वाजते आणि पाऊस पडतो त्यामुळे कोणता ऋतू चालू आहे हे आता सांगणं सुद्धा शक्य नाही. त्यामुळे आता खरोखरच प्रभू रामचंद्र अवतार घेईल काय? असे वाटत आहे . आपण सर्वांनी मिळून चांगले आदर्श निर्माण करता येईल काय ? ते पाहू तरच रामनवमी साजरी केल्याचे सर्वांना समाधान मिळेल, नाहीतर आली तशी ती जाईल हे वास्तविक कटू सत्य आहे . नुकताच अयोध्या नगरी येथे हा प्रभू रामचंद्राची मूर्ती बसून सर्व भारतीयांना सुखदायी सोहळा झाला आहे. प्रभू रामचंद्राच्या दर्शनाने मनाला आनंद होत आहे. चला अयोध्या नगरीत एकदा जाऊ या, आणि मंत्र जपूया,जय श्रीराम जय राम, जय जय राम ,रामनवमीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा

**प्रा.बरसमवाड विठ्ठल गणपत**
**अध्यक्ष: विठूमाऊली प्रतिष्ठान**
**खैरकावाडी ती. मुखेड**

# पंकजाताई मुंडेंच्या विजयासाठी परळीत महायुतीचे कार्यकर्ते सरसावले

लोकनेता न्यूज नेटवर्क

**परळी । प्रतिनिधी**

भाजपा महायुतीच्या बीड लोकसभा मतदार संघातील उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते सरसावले आहेत. शहरात आज मोठ्या उत्साहात महायुतीमधील घटक पक्षांच्या सर्व कार्यकर्त्यांनी जोरदार प्रचारफेरी काढून मतदारांशी थेट संपर्क साधून पंकजाताईंना विक्रमी मताधिक्य देऊन विजयी करावे असे आवाहन केले.

जिल्हयाचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे, खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ८ वाजता संत जगमित्र नागा मंदिर येथुन प्रारंभ झालेल्या या प्रचार फेरीत महायुतीचे फलक व पंकजाताई यांच्या संकल्पनेतील बीड जिल्ह्याच्या विकासाचे मुद्दे मतदारांना पटवून देण्यात आले.या प्रचारफेरीचे मतदारांनी ठिकठिकाणी स्वागतही केले. पंकजाताई मुंडे यांच्या उमेदवारीची महायुतीकडुन घोषणा झाल्यानंतर होमपिच असलेल्या परळी शहरात उत्साहाचे वातावरण आहे.उमेदवारी अर्ज दाखल



करण्याच्या काही दिवस अगोदरच परळी शहरातील भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट),रिपाइं आदी महायुतीमधील घटक पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्त्यांनी संत जगमित्र नागा मंदिर, नेहरु चौक, बाजीप्रभु नगर, पंचवटी नगर, स्नेहनगर,पॉवर लुम,इंडस्ट्रीयल एरिया,माणिक नगर,शास्त्री नगर,नाथ नगर,शिवाजी नगर,जिव्हेश्वर नगर,न्यू माणिक नगर माणिक नगर आदी भागात प्रचारफेरी काढली. पंकजाताई यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात थेट केंद्र सरकारच्या योजना आणुन मोठे प्रकल्प उभारुन रोजगार निर्मितीसाठी साथ द्यावी असे आवाहन यावेळी करण्यात आले. प्रचारफेरीचा समारोप माणिकनगर येथे करण्यात आला.या व्यापक प्रचारफेरीचे मतदार,नागरीकांनी आपापल्या भागात स्वागत केले.प्रचारफेरीत महिलांचा सहभाग लक्षणीय होता.स्वंयस्फुर्तीने सहभागी झालेले महायुतीचे कार्यकर्ते पंकजाताई यांना परळी शहरातुन मोठे मताधिक्य देण्यासाठी या रॅलीच्या माध्यमातुन एकवटल्याचे दिसून आले.

# शहरात असलेल्या एकमेव उभा शंकर पार्वती मंदिरातील अनोख्या शिव पार्वती विवाह सोहळ्याची जय्यत तयारी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत शहरातील रंगार गल्लीत असलेल्या उभ्या शंकर पार्वती मंदीरामध्ये तिथी अष्टमी दिनांक २९-३-२०२३ रोजी. साध्य.७.५वा. शिव- पार्वती विवाह सोहळा सपंन्न होणार आहे. त्याची जय्यत तयार सूरू आहे.
सविस्तर वृत्त असे की,
भारतात कूठेच ऊभी शिव पार्वतीची मूर्ती नाही. पण मानवत येथे प. पु. वेदमुर्ती संपन्न शिवैक्य गंगाधर (बापु)जंगम ( स्वामी) यांनी या मंदिराची प्राणप्रतिष्ठा केली आहे. याच मंदिराच्या पाठीमागे एक विहीर आहे,यातुन एक भुयारी मार्ग आहे याघरवजामंदिराच्या तळमजल्याखाली नित्य नियमाने पुजा अर्चा करत असताना गंगाधर महाराजांना आकाशवाणी झाली मला या विहीरीतुन बाहेर काढ आणि माझी स्थापना कर, यातुन ही शंकर पार्वती आणि नंदीची मूर्ती सापडली आणि यांची स्थापना केली. जो भक्त खर्या श्रध्देने मनोभावे भक्ती करेल , यांना या देवतांचे तिनं रूप दिसतात



सकाळी प्रहारी. बालपण , दुपारी तरूणपण , सायंकाळी वृध्द पण असे तिन रूप दिसतात, या समोर असलेल्या नदीवर बसुन शंकरपार्वती गावप्रदक्षणा घालतात म्हणून सायंकाळी या मंदिराच्या दरवाजाजवळ थाबुनये असा संकेत आहे. वैशिष्ट्ये शंकराला चार हात आहेत हातात त्रिशुल , रिंग आहे जठेमध्ये गंगा आहे, सोबत पार्वती ही ३.५फुट उंचीची आणि शंकर ४फुट उंचीचे सावळ्या रंगात उभी मुर्ती ही भारतात एकमेव मुर्ती आहे. या मंदिराचा काळखंड सांगता येत नाही कारण ही अतिप्राचिन मंदिर आहे. छोट्या अरूंद रस्ता मध्ये एक घरवजा मंदिर बांधले आहे. ❋काशिनाथ जंगम परिवारातील जंगम (स्वामी ) परिवार पाच सहा पिढ्यांपासून या मंदिराची सेवा करतात गंगाधर बापु हे या कुटुंबाचे पुर्वज आहे. आज घडिला ❋माजी नगराध्यक्ष नंदकुमार महादेव स्वामी (जंगम) आणि परिवार मंदिर सेवाधारी आहे. उर्वरीत कुटुंब परभणी येथे आहे ❋विरेश अण्णासाहेब जंगम (स्वामी), शंभोलिंग अण्णासाहेब जंगम (स्वामी) , महालिंग अण्णासाहेब जंगम (स्वामी) महेश मन्मथ जंगम (स्वामी) ❋दिनेश मन्मथ जंगम (स्वामी) माहिती सादर करते. सामाजिक कार्यकर्त्या ❋वीरशैव विचार मंच संस्थापक अध्यक्ष चित्रकार महेश मन्मथ जंगम (स्वामी) यांनी या विवाह सोहळ्या विषयी माहीती दिली.

# विकास हीच माझी जात, संधी द्या, मतदान व्यर्थ जाणार नाही-पंकजाताई

लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । प्रतिनिधी**

आपला जिल्हा,आपली माणसं एवढाच दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन मी सत्तापदाच्या काळात केवळ विकासाचं राजकारण केलं. हा जिल्हा पश्चिम महाराष्ट्रापेक्षाही विकासाच्या प्रवाहात पुढे जावा हे माझं स्वप्न आहे. तुम्ही ह्रदयावर हात ठेवुन माझ्यावर विश्वास ठेवा, दिलेलं मतदान वाया जाणार नाही, विकास हीच माझी जात असून पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच पुन्हा तिसर्यांदा पंतप्रधान होतील तेव्हा त्यांच्याकडून क्षणोक्षणी जिल्ह्याचं भाग्य उजळण्यासाठी मी मिळालेल्या संधीचं सोनं केल्याशिवाय रहाणार नाही या शब्दांत लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडेंनी मतदारांना आवाहन केले. दरम्यान पंकजाताई म्हणजे सर्व जातीधर्माच्या लोकांना सोबत घेवुन चालणारी शक्ती असुन मागच्या लोकसभा निवडणुकीत बजरंग सोनवणेना पाच लाख मते मिळाले. मात्र पाच वर्षात कुठल्या बिळात लपले? हा सवाल करत आडसकरांनी जातीपातीपेक्षा पुढे जावुन सामान्य जनतेच्या हितासाठी पंकजाताईचं नेतृत्व जपावे एवढेच नव्हे तर आम्ही सर्व खंबीरपणे त्यांच्या पाठीमागे असल्याचे प्रतिपादन केले. केज येथे शारदा इंग्लिश स्कुल प्रांगणात महायुतीच्या कार्यकर्त्याचा संवाद मेळावा पार पडला. त्याप्रसंगी मान्यवर बोलत होते. जनसमुदायासमोर बोलताना पंकजाताई पुढे म्हणाल्या, माजलगाव मतदारसंघा एवढंच लक्ष्य आडसकरांचं केज तालुक्यात आहे. मागील पंधरा वर्षापासुन आम्ही एकत्र काम करतो. सामान्य माणुस हाच खर्या अर्थाने माझ्या राजकारणाचा केंद्रबिंदु आहे हे सांगताना मी जिल्ह्यात केवळ विकासाचं राजकारण केलं, त्यामुळे कुणाचीही तक्रार माझ्याविरोधात व्यक्तीद्वेषाची नाही हीच माझ्या कामाची पावती म्हणावी लागेल. विरोधकांना प्रचारात माझ्या विरोधात मुद्दाही नाही. पालकमंत्री म्हणून केलेल्या विकासाची कामं निवडणुक प्रचारात ठिकठिकाणी गेल्यानंतर लोक मलाच सांगतात की, ताई तुमच्यामुळे ही योजना आली. मी जातीपातीचं राजकारण कधी केलं नाही. वेगवेगळ्या चर्चा सामाजिक करणावर जेव्हा पुढे येतात त्यावेळी यात माझा गुन्हा काय? हा सवाल करत त्यांनी तुम्ही ह्रदयावर हात ठेवुन मला मतदान करा. तुम्ही टाकलेला विश्वास तिळाएवढा ढळू न देता केंद्र सरकारच्या सर्व योजना एवढेच नव्हे तर दहा हजार तरूणांना रोजगार



मिळेल एवढा उद्योग आपल्या जिल्ह्यात आणुनच दाखवेल. कॅन्सर अद्ययावत हॉस्पीटल उभा करून गोरगरिबांच्या आरोग्य रक्षणाचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे त्यांनी सांगितले.माझ्या रूपाने फार मोठी संधी तुम्हाला चालुन येत आहे. त्यामुळे जात, धर्म नाराजी एका बाजुला तर मिळत असलेली संधी दुसर्या बाजुला. वैचारिक विचार जर केला तर केवळ एकदा संधी देवुन बघा, मी सेवकाच्या भुमिकेत काम केल्याशिवाय रहाणार नाही. संविधानिक पदाची संधी सामान्य जनतेच्या हितासाठी असते. जे मी पालकमंत्री असताना करून दाखवलं. अगोदर मी केले हे सांगताना बीड-नगर-परळी रेल्वेचा प्रश्न आणि राष्ट्रीय महामार्ग बांधणी केली. ज्यामुळे देशाच्या नकाशावर आपला जिल्हा आला. शत्रुला देखील मी विकासाच्या कामात मदत केली. कुणालाही वैयक्तिक द्वेषापोटी त्रास दिला नाही. कुठल्याही संकटात आम्ही धावुन आलो. मग पाच वर्षे विरोधी उमेदवार कुठे होते? हा सवाल त्यांनी केला.भाजपा नेते रमेश आडसकरांनी नेतृत्वाला पाठिंबा देण्यासाठी बोलवलेल्या बैठकीचे रूपांतर जाहिर सभेत झाले. त्यात बोलताना पंकजाताई ह्या केवळ विकासाची वाघीण असुन मागच्या काही वर्षापासून त्यांना आम्ही जवळुन पहातो. जातीवाद त्यांच्या स्वभावात नक्कीच नाही. कारण विकासाच्या प्रश्नावर त्यांनी सकारात्मक घेतलेली भुमिका ज्यामुळे आपल्या जिल्ह्याचे राजकारण त्या काळात व्यक्तीद्वेषाकडे कधीच गेलं नाही. बजरंग सोनवणे यांना मागच्या निवडणुकीत बर्यापैकी मते मिळाली. पण पाच वर्षात कधीच यांनी सामान्य जनतेला तोंड दाखवलं नसल्याचा आरोप त्यांनी केला. जुन्या आणि नव्या लोकांची सांगड घालुन मी सामान्य जनतेची सेवा करतो. त्यामुळे गोरगरिबांचा विश्वास आमच्यावर असुन पंकजाताईला प्रचंड मताधिक्य देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. आपला खासदार निवडुन आल्यानंतर केंद्रात वजनदार मंत्री होणार त्यामुळे जिल्ह्याचं भाग्य निश्चित उजळेल हे सांगताना त्यांनी मराठा आरक्षणावर मुंडे कुटुंबियांनी राजकारण न करता नेहमीच आपल्याला पाठिंबा दिल्याचे ठणकावुन सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवा नेते ऋषी आडसकर यांनी केले. केज नगर परिषद गट नेता हारूण इनामदार यांनी भगिनी पंकजाताईला मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने मतदान करतील हे सांगताना स्व.मुंडे साहेबांचं स्वप्न साकार करण्याची क्षमता ताईमध्ये असल्याने आम्ही त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहू हे सांगितले.यावेळी बाजार समितीचे सभापती अंकुशराव इंगळे, नगराध्यक्ष सीताताई बनसोड, भागवतदादा गोरे, नाना गुरूजी, डॉ.योगिता थोरात, धैर्यशील देशमुख, सुमन धस, उषा मुंडे, उत्तमराव आणे, गोरख रसाळ, गौतम चौधरी, सर्जेराव वाघमोडे, युवराजदादा काळे, दिलीपआबा गुळभिले, संदिप पाटील, दिपक शिंदे, महादेव आदमाने गुरूजी आदीसह विविध गावचे सरपंच,चेअरमन, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते

# महाराष्ट्रातील ८७ हून अधिक उमेदवार यशस्वी
# केंद्रीय लोकसेवा आयोगाचा निकाल जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत देशातील एकूण १०१६ उमेदवार यशस्वी झाले आहेत. यापैकी राज्यातील ८७ हून अधिक उमदेवारांनी घवघवीत यश मिळविले आहे. एकूण निवड झालेल्या उमेदवारांपैकी जवळपास ८.६ टक्के महाराष्ट्रातून आहेत. राज्यातून समीर प्रकाश खोडे प्रथम, देशात त्यांनी ४२ वा क्रमांक पटकाविला आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाचा वर्ष २०२३ च्या मुख्य परिक्षेचा अंतिम निकाल मंगळवारी जाहीर झाला. या निकालात पहिल्या १०० उमेदवारांमधे महाराष्ट्रातील तीन उमेदवारांचा समावेश आहे. नेहा राजपूत यांनी ५१वा तर अनिकेत हिरडे यांनी ८१ वा क्रमांक पटकावला आहे.

एक नजर निकालावर

समीर प्रकाश खोडे (४२) नेहा उद्धवसिंग राजपूत (५१) अनिकेत ज्ञानेश्वर हिर्डे (८१) विनय सुनील पाटील (१२२) विवेक विश्वनाथ सोनवणे (१२६) तेजस सुदीप सारडा (१२८) जान्हवी बाळासाहेब शेखर (१४५) आशिष अशोक पाटील (१४७) अर्चित पराग डोंगरे (१५३) तन्मयी सुहास देसाई (१९०) ऋषिकेश विजय ठाकरे (२२४) अभिषेक प्रमोद टाले (२४९) समर्थ अविनाश शिंदे (२५५) मनीषा धारवे (२५७) शामल कल्याणराव भगत (२५८) आशिष विद्याधर उन्हाळे (२६७) शारदा गजानन मद्येश्वर (२८५) निरंजन महेंद्रसिंह जाधवराव (२८७) समिक्षा म्हेत्रे (३०२) हर्षल भगवान घोगरे (३०८) वृषाली संतराम कांबळे (३१०) शुभम भगवान थिटे (३५९) अंकेत केशवराव जाधव (३९५) शुभम शरद बेहेरे (३९७) मंगेश पाराजी खिलारी (४१४) मयूर भारतसिंग गिरासे (४२२) अदिती संजय चौगुले (४३३) अनिकेत लक्ष्मीकांत कुलकर्णी (४३७) क्षितिज गुरभेले (४४१) अभिषेक डांगे (४५२) स्वाती मोहन राठोड (४९२) लोकेश मनोहर पाटील (४९६) सागर संजय भामरे (५२३) मानसी नानाभाऊ साकोरे (५३१) नेहा नंदकुमार पाटील (५३३) युगल कापसे (५३५) हर्षल राजेश महाजन (५३९) अपूर्व अमृत बालपांडे (५४६) शुभम सुरेश पवार (५६०) विक्रम जोशी (५९३) प्रियंका मोहिते (५९५) अविष्कार डेरले (६०४) केतन अशोक इंगोले (६१०) राजश्री शांताराम देशमुख (६२२) संस्कार निलाक्ष गुप्ता (६२९) सुमित तावरे (६५५) सुरेश लीलाधरराव बोरकर (६५८) अभिषेक अभय ओझर्डे (६६९) नम्रता घोरपडे (६७५) जिज्ञासा सहारे (६८१) श्रुति कोकाटे (६८५) अजय डोके(६८७) सूरज प्रभाकर निकम (७०६) श्वेता गाडे (७११) अभिजित पखारे (७२०) कृणाल अहिरराव (७३२) हिमांशु टेंभेकर (७३८) सुमितकुमार धोत्रे (७५०) गौरी देवरे (७५९) प्रांजली खांडेकर (७६१) प्रितेश बाविस्कर (७६७) प्रशांत डांगळे (७७५) प्रतिक मंत्री (७८६) मयुरी माधवराव महल्ले (७९४) राहुल पाटील (८०४) सिध्दार्थ तागड (८०९) प्राजंली नवले (८१५) सिध्दार्थ बारवळ (८२३) ओमकार साबळे (८४४) प्रशांत सुरेश भोजने (८४९) प्रतिक बनसोडे (८६२) चिन्मय बनसोड (८९३) निखील चव्हाण (९००) विश्वजीत होळकर (९०५) अक्षय लांबे (९०८) निलेश डाके (९१८) किशनकुमार जाधव (९२३) ऐश्वर्या दादाराव उके (९४३) स्नेहल वाघमारे (९४५) शुभम त्रंबकराव डोंगरदिवे (९६३) गौरव हितेश टेंभुर्णीकर (९६६) मयांक खरे (९६८) शिवानी वासेकर (९७१) श्रावण अमरसिंह देशमुख (९७६) श्रुती उत्तम श्रोते (९८१) सुशीलकुमार सुनील शिंदे (९८९) आदित्य अनिल बामणे (१०१५)

केंद्र शासनाच्या विविध सेवांमधील रिक्त जागांसाठी सप्टेंबर २०२३ मध्ये मुख्य परीक्षा घेण्यात आली. जानेवारी - एप्रिल २०२४ दरम्यान परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या परिक्षेच्या निकालातील उत्तीर्ण १०१६ उमेदवारांची केंद्रीय लोकसेवा आयोगाने विविध सेवेतील पदांच्या नियुक्तीसाठी शिफारस केली आहे. यामध्ये सामान्य (ओपन) गटातून -३४७, आर्थिक मागास प्रवर्गातून (ईडब्ल्यूएस) ११५, इतर मागासवर्गीय प्रवर्गातून (ओबीसी) - ३०३, अनुसूचित जाती प्रवर्गातून (एससी) - १६५, अनुसूचित जमाती प्रवर्गातून- ८६ उमेदवारांचा समावेश आहे. एकूण यशस्वी उमेदवारांमध्ये ३७ दिव्यांग उमेदवारांचा (१६ ऑर्थोपेडिकली अपंग, ०६ दृष्टीहीन, ०५ श्रवणदोष आणि १० एकाधिक अपंग) यांचा समावेश आहे. लोकसेवा आयोगाने २४० उमेदवारांची आरक्षित सूची (ठशीर्शींश डळीीं) तयार केली आहे. यामध्ये सामान्य गट- १२०, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस)- ३६, इतर मागास वर्ग -६६, अनुसूचित जाती- १०, अनुसूचित जमाती - ०४ उमेदवारांचा समावेश आहे. यासोबत एकूण चार दिव्यांग उमेदवारांचा समावेश आहे.

या रिक्त पदांवर उमेदवार होतील रूजू

भारतीय प्रशासन सेवा (आयएएस) या सेवेत शासनाकडे एकूण -१८० जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गट (जनरल) - ७३, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) १७ इतर मागास वर्ग (ओबीसी) -४९, अनुसूचित जाती (एससी) - २७, अनुसूचित जमाती (एसटी) १४ जागा रिक्त आहेत. उमेदवारांच्या गुणानुक्रमे रिक्त जागांवर यशस्वी उमेदवारांची निवड केली जाईल.

भारतीय विदेश सेवा (आयएफएस) या सेवेत शासनाकडे एकूण - ३७ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गट (ओपन) - १६, आर्थिक मागास प्रवर्ग(ईडब्ल्यूएस) ०४, इतर मागास वर्ग (ओबीसी) - १०, अनुसूचित जाती (एससी) - ०५, अनुसूचित जमाती (एस.टी.) - ०२ जागा रिक्त आहेत.

भारतीय पोलिस सेवा (आयपीएस) या सेवेमध्ये एकूण - २०० जागा रिक्त आहेत, यामध्ये सामान्य गटातून (ओपन) - ८०, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) २०, इतर मागास प्रवर्गातून - ५५, अनुसूचित जाती प्रवर्गातून - ३२, तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून - १३ उमेदवारांना नियुक्ती दिली जाणार आहे.

केंद्रीय सेवा गट अ - या सेवेमध्ये एकूण - ६१३ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गटातून (ओपन) - २५८, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) ६४ , इतर मागास प्रवर्गातून - १६०, अनुसूचित जाती प्रवर्गातून - ८६ तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून - ४५ उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

केंद्रीय सेवा गट ब - या सेवेमध्ये एकूण - ११३ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गटातून (ओपन) - ४७, आर्थिक मागास प्रवर्ग(ईडब्ल्यूएस) १० उमेदवार, इतर मागास प्रवर्गातून - २९, अनुसूचित जाती प्रवर्गातून - १५ तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून -१२ उमेदवारांना नियुक्ती दिली जाईल.

एकूण ३५५ उमेदवारांची निवड तात्पुरत्या स्वरुपाची असेल. अधिकृत निकाल व यशस्वी उमदेवारांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या ु.ीिलि.सीं.ळप या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

# इमामवाडी येथे अनैतिक संबंधातून दाम्पत्याने संपविले जीवन

## शिक्षकांसह तिघांविरुद्ध गुन्हा;पोलीसांच्या आश्वासना नंतर नातेवाईकांनी पार्थिव घेतले ताब्यात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । प्रतिनिधी**





कंधार तालुक्यातील इमामवाडी येथे पतीने गळफास घेऊन आत्महत्या केल्यानंतर पत्नीने देखील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली होती.पत्नीच्या अनैतिक संबंधातून हा प्रकार घडला असून, याप्रकरणी आरोपी शिक्षकासह त्याची पत्नी, मुलगी आणि मयत महिलेविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.रामदास करेवाड (३५) आणि वर्षा रामदास करेवाड असे मयत पती-पत्नीची नावे आहेत. कंधार तालुक्यातील इमामवाडी येथे रामदास हा आई, वडील, पत्नी,मुला-बाळांसह वास्तव्यास होते. रामदास हा कंधार येथे एका डॉक्टरकडे कंम्पाउंडर म्हणून काम करत होता,तसेच ऑटो चालवून उदरनिर्वाह करीत होता. पत्नी वर्षा ही कंधार येथील जीएनएम कॉलेजमध्ये नर्सिंगचा कोर्स करत होती. तसेच गावातील जिल्हा परिषद शाळेच्या शालेय शिक्षण समितीची ती उपाध्यक्ष होती. तर सुभाष कदम (रा. बामणी) हे याच शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते.त्यामुळे या दोघांची ओळख झाली.त्यातच अधून-मधून वर्षांच्या घरी सुभाषचे येणे जाणे वाढले होते.

दरम्यान, एक महिन्यापूर्वी रामदास यास सुभाष कदम यांची मुलगी शीतल हिने फोन केला होता. तू तुझ्या बायकोला सांभाळ, तिचे माझे वडील सुभाष कदम यांच्या सोबत अनैतिक प्रेम संबंध सुरू आहेत,असे सांगितले. रामदास यांनी घरी सांगितल्याने नातेवाईकांनी सून वर्षा व सुभाष कदम यांना समज दिली होती. परंतु त्यांच्या वागण्यात बदल झाला नाही.त्यामुळे रामदास सतत तणावाखाली राहत होता.

त्यातच सुभाष कदम यांची बायको लता कदम व मुलगी शीतल कदम हे देखील रामदास यास वारंवार मानसिक त्रास देत.तुझ्या बायकोला निट सांभाळ,नाहीतर तिला खतम करुन टाकू, अशी धमकी देत असल्याने रामदास हा तणावात होता. शेतातील चिंचेच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. तर पत्नी वर्षा करेवाड हिने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली.प्रारंभी याप्रकरणी संतोष करेवाड यांच्या फिर्यादीवरून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. चिठ्ठी सापडल्यानंतर दांपत्याच्या आत्महत्येचे कारण स्पष्ट झाले त्यानंतर रामदास यांची आई सुमनबाई सोपान करेवाड (वय ३०) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिक्षक सुभाष रामराव कदम,पत्नी लता सुभाष कदम, त्यांची मुलगी शितल व मयत वर्षा रामदास कदम यांच्याविरूद्ध भादंवी ३०६, ३४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दरम्यान दांपत्याच्या आत्महत्येस जबाबदार असलेल्यांना जोपर्यंत अटक होत नाही तोपर्यंत मयतांचे शव ताब्यात घेण्यास नातेवाईकांनी नकार दिला असून त्यांनी पोलीस ठाण्याच्या आवारात ठिय्या मांडला आहे. नातेवाईकांच्या या भूमिकेमुळे शवविच्छेदनानंतरही शव ग्रामीण रुग्णालयात पडून होते. सायंकाळी उशिरा पोलिसांनी मध्यस्थी करत आरोपीला अटक करण्याचे आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांनी दोघांचेही पार्थिव ताब्यात घेतल्याचे सांगण्यात आले,

### मृतांच्याआईने सांगितला घटनाक्रम

माझा मुलगा ऑटो चालून संसाराचा गाडा चालवीत होता. गावातील जिल्हा परिषद शाळेवर असलेले सुभाष कदम नावाचे शिक्षक माझ्या सुनबाईला शालेय समितीवर जवळपास दोन वर्षापासून घेतले होते.त्यामुळे माझ्या सुनबाईचे शाळेवर तर शिक्षकाचे घरी येणे जाणे वाढले होते.माझी सुनबाई कंधार येथील बाळंतवाडी येथे नर्सिंगचे शिक्षण घेत होती. या शिक्षकांनी तिला शाळेवर नेऊन सोडल्याची माझ्या मुलांच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे दोघांमध्ये नेहमीच भांडण वाढत गेले.आणि या शिक्षकाचे असलेल्या अनैतिक संबंधामुळे माझ्या मुलाने आपले जीवन संपविले.

### मृत्यूपूर्वी चिठ्ठी व्हॉट्सप फॅमिली ग्रुपवर

रामदास करेवाड याने गळफास घेण्यापूर्वी एक चिठ्ठी लिहिली होती. त्यांच्या जीवितास काही बरेवाईट झाले तर त्यास सुभाष कदम सर व त्यांची बायको वर्षा माणिका बोराळे ही जबाबदार राहील,असे लिहिलेले आहे.तसेच ती चिठ्ठी त्यांने आत्महत्येपूर्वी व्हॉट्सप फॅमिली ग्रुप तयार करुन त्यावर टाकली होती.

## हिंगोली लोकसभेच्या विकासासाठी

# महायुतीचे उमेदवार बाबुराव कदम कोहळीकर यांना दिल्लीत पाठवा-रामदास पाटील सुमठाणकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या प्रचारासाठी भाजपचे सर्वच कार्यकर्ते पदाधिकारी सक्रीय होऊन झपाटून कामाला लागले आहेत.पायाला भिंगरी बांधून बूथ निहाय,सर्कल निहाय संवाद दौरा सुरू झाला आहे.

भारताला एक बलशाली राष्ट्र बनविण्यासाठी आपण सर्वजण कार्य करत आहोत.यासाठी मोदी साहेबांना एक मत आपल्या हिंगोली लोकसभेचे असेल हा ठाम विश्वास आहे.

महायुतीचे उमेदवार बाबुराव कदम हे सामान्य कुटुंबातील व्यक्ती आहेत.त्यामुळे बाबुराव कदम यांना सामान्य जनतेच्या प्रश्नांची जाणीव आहे.म्हणून बाबुराव हे सामन्याचे प्रश्न दिल्ली दरबारी अतिशय पोटतिडकीने मांडतील असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.बाबुराव कदम यांच्या पाठी मागे भाजपची सर्व संघटनात्मक यंत्रणा सज्ज असल्याने ते सहज विजयी होतील असा विश्वास रामदास पाटील सुमठाणकर यांनी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाखालीच देशाचा विकास झाला आहे. 'सब का साथ,सब का विकास,' या मोदींजीच्या घोषणेवर विश्वास ठेवून आम्ही कार्यकर्ते कामाला लागलो आहोत.मोदीजीं पुन्हा ३ री वेळ पंतप्रधान होणार याची संपूर्ण जगाला खात्री आहे. प्रत्येक मतदाराने जात, धर्म सोडून मोदीजींना मतदान देण्याचे मन बनवले आहे. ही राष्ट्रीय निवडणूक असल्यामुळे देश हितासाठी एक मत मोदीजींना देण्याची विनंती रामदास पाटील यांनी केली.

पंतप्रधान मोदी यांनी केलेली कामे सर्वसामान्य मतदारांपर्यंत पोहोचली असल्याने आमच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला आहे असे ते सांगतात आणि मागील लोकसभेच्या मतापेक्षा जास्तीचे मताढिक्या घेऊन आमचा उमेदवार जिंकून येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हिंगोली लोकसभेत बाबूराव कदम कोहळीकर यांना विक्रमी मताधिक्य मिळण्यासाठी सर्व भाजपा कार्यकर्त्यांनी कंबर कसून काम करावेअसे आवाहन केलं. महायुतीतील सर्व घटक पक्षांचे मनोमीलन असून एक वज्रमुठीने दिवस रात्र कार्य करत आहेत.

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**आष्टी:आमचे परममित्र सय्यद तय्यब सर यांच्या चघ निवासस्थानी आज ईद मिलाफ कार्यक्रमचे आयोजन करण्यात आले होते त्यानिमित्ताने त्यांची भेट घेऊन त्यांना ईदच्या शुभेच्छा देताना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम पत्रकार आणासाहेब साबळे यांनी दिल्या. यावेळी प्रा हरिस चाऊस,मुजीब शेख सर दिसत आहेत.**



# भारतीय जवान किसान पार्टी कडून बीड लोकसभा निवडणूक लढवणार-अंकुश खोटे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

भारतीय जवान किसान पार्टी आणि शेतकरी संघटना या युतीतर्फे संपूर्ण देशभर लोकसभा निवडणुकीमध्ये उमेदवार उभे करणार असून बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये भारतीय जवान किसान पार्टी आणि शेतकरी संघटना या युतीचे उमेदवार म्हणून आपण बीड लोकसभा मतदारसंघाची निवडणूक लढवणार आहोत अशी माहिती महाराष्ट्र राज्याचे त्रिदल सैनिक सेवा संघ संस्थापक अध्यक्ष अंकुश रामभाऊ खोटे यांनी दिली..

आष्टी येथील त्रिदल सैनिक सेवा संघ कार्यालयामध्ये पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते.. यावेळी त्यांच्यासोबत त्रिदल सैनिक सेवा संघाचे महाराष्ट्र राज्याचे सचिव नवनाथ झगडे, सहसचिव बबन दहिफळे, शहराध्यक्ष श्रीराम माने, आष्टी तालुका अध्यक्ष नवनाथ भगत, संचालक मनीष नरवडे, संचालक जनार्दन धनवडे, कैलास पारखे आदि उपस्थित होते याविषयी अधिक माहिती देताना अंकुश रामभाऊ खोटे पुढे म्हणाले की, शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथ दादा पाटील आणि भारतीय जवान किसान पार्टी चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण अंकुशे यांचे मार्गदर्शनाखाली भारत देशामध्ये ३४८ लोकसभा मतदारसंघांमध्ये उमेदवार उभे करण्यात येणार असून महाराष्ट्र राज्यामध्ये २२ लोकसभा मतदारसंघांमध्ये या युतीतर्फे उमेदवार उभे करण्यात येणार आहेत अशी माहिती देऊन स्वतः विषयी बोलताना अंकुश खोटे म्हणाले की, आपण १९८४ ते २०१० या कालावधी मध्ये सैन्य दलामध्ये देशसेवा केलेली असून या कालावधीमध्ये हिमाचल प्रदेश, लेह, जम्मू-काश्मीर, सिक्कीम, राजस्थान, अरुणाचल प्रदेश, उत्तर प्रदेश या ठिकाणी काम केलेले असून त्रिदल सैनिक सेवा संघ या संघटनेच्या महाराष्ट्रभर ९३६ ठिकाणी शाखा कार्यरत असून या संघटनेतर्फे शहीद वीर माता, वीर पत्नी, तसेच माजी सैनिकांच्या समस्या सोडवण्याचे अखंडपणे काम सुरू आहे आजवर ८६४ माजी सैनिकांच्या समस्यां आम्ही संघटनेद्वारे प्रश्न सोडवल्या आहेत असे सांगून भारतीय राजकारणामध्ये



जय जवान जय किसान मिशन - ५४३ लोकसभा अंतर्गत भारतीय जवान किसान पार्टी आणि शेतकरी संघटना यांचे संयुक्त उमेदवार म्हणून भारतीय राजकारणामध्ये बदल घडवणार आहोत.देशाच्या विकासासाठी, शांतीसाठी, शहीद सैनिकांच्या सन्मानासाठी आणि तिरंग्याची शान राखावी यासाठी आम्ही निवडणूक लढवणार आहोत असे सांगत.. महागाई कमी करण्यासाठी.. शेतकऱ्यांच्या पिकाला हमीभाव, बी बियाणे, खते यावर सबसिडी, कर्जमाफी, दुधाला हमीभाव, सोलर पंप या द्वारे शेतकऱ्यांची सेवा करणार असून युवकांना रोजगार मिळावा यासाठी, महिलांसाठी महिला सन्मान, सुरक्षा आणि महिलांच्या रोजगारासाठी ५००० कोटी रुपयांचे बजेट उपलब्ध करून देणार आहोत तसेच सैनिकांसाठी वन रँक वन पेन्शन, प्रत्येक तालुक्यामध्ये सीएसडी कॅन्टीन आणि जुनी पेन्शन लागू करण्यात येईल आणि सर्वसामान्य जनतेसाठी जिल्हा न्यायालय उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय एकेका वर्षात निकाल घेण्याची तरतूद, तसेच सर्व बेघर कुटुंबांना घरकुल, तरुणाईची व्यसनमुक्ती, देशात शांती आणि अखंडता कायम ठेवण्यासाठी प्रयत्न केले जातील आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे खासदार आणि आमदार यांची पेन्शन बंद केली जाईल...

शेतकरी, सैनिक आणि कामगार वर्गाच्या मुलींच्या लग्नासाठी पन्नास हजार ते दोन लाख रुपये तरतूद करण्यात येईल असे आश्वासन आमच्या भारतीय जवान किसान पार्टी या पक्षाच्या जाहीरनाम्यामध्ये उल्लेख असल्याचेही त्यांनी शेवटी सांगितले तसेच बीड जिल्हा हा अत्यंत जागृत मतदार असलेला जिल्हा असून या ठिकाणी यापूर्वी धक्कादायक निकाल लागलेले असून बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये मी मतदार जनतेला आवाहन करतो की, गिफ्ट बॉक्स हे माझे निवडणूक चिन्ह असून मतदानाचे गिफ्ट दिल्यास मी अत्यंत प्रामाणिकपणे रिटर्न गिफ्ट मतदाराला देईल असे त्यांनी शेवटी सांगितलेक्ष

# होय, मी मतदान करणारच निवडणूक निरीक्षकांचा निर्धार

# उपविभागीय कार्यालयातील फलकावर स्वाक्षरी करत दिला संदेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघांतर्गत आज सहायक निवडणूक अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालयातील फलकावर स्वाक्षरी करत 'होय, मी मतदान करणारच!' असा निर्धार करत निवडणूक निरीक्षक श्रीमती एम. एस. अर्चना यांनी हिंगोली लोकसभा मतदार संघातील मतदारांना तुम्हीही मतदान करत लोकशाही बळकट करण्याचे आवाहन केले.

यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, आचार संहिता अंमलबजावणी कक्ष नोडल अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद हिंगोली अरविंद मुंढे, स्वीप पथकाचे नोडल अधिकारी गंगाधर बिरमवार, अपर तहसीलदार श्रीमती सावित्री भुरे, अपर तहसीलदार हिमालय घोरपडे आदी उपस्थित होते.





मतदार जनजागृती कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी श्रीमती अर्चना उपस्थित होत्या. यावेळी मतदारांना मतदान करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सूर्यप्रकाश कला पथक खरवड यांचा मतदान जनजागृतीपर संगीतमय गीतांद्वारे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी लोकगीत, पथनाट्याद्वारे मतदार जागृतीचे सादरीकरण निवडणूक निरीक्षक श्रीमती एम. एस. अर्चना यांच्यासमक्ष करण्यात आले. हा रथ हिंगोली विधानसभा मतदारसंघात फिरत जनजागृती करणार आहे, असे सहायक निवडणूक अधिकारी श्री. पारधी यांनी निवडणूक निरीक्षकांना सांगितले.

यावेळी निवडणूक निरीक्षक श्रीमती एम. एस. अर्चना यांनी उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयातील हिंगोली लोकसभा सार्वत्रिक निवडणूक अंतर्गत स्थापित आदर्श आचार संहिता अंमलबजावणी कक्ष आणि प्रसार माध्यम समिती कक्षास भेट देऊन तेथील कामकाजाचा आढावा घेतला. तसेच जतन करण्यात आलेल्या संचिकाची पाहणी केली.

यावेळी प्रसार माध्यम समिती कक्षाचे नोडल अधिकारी पंडित मस्के, प्रसार मध्यम सहायक बाळू बांगर, विजय रामेश्वरे, तसेच आदर्श आचार संहिता अंमलबजावणी कक्ष आणि प्रसार माध्यम समिती कक्षाती

## हिंगोली लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत

# वापरण्यात येणाऱ्या पुरवणी बॅलेट युनिटची प्रथमस्तरीय सरमिसळ प्रक्रिया पूण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

लोकसभा निवडणुकीकरिता जिल्ह्यातील मतदान केंद्रावर वितरीत करावयाच्या २ हजार ५७२ बॅलेट युनिटची प्रथमस्तरीय सरमिसळीकरणाची (फर्स्ट रॅण्डमायझेशन) प्रक्रिया सामान्य निवडणूक निरीक्षक श्रीमती एम. एस. अर्चना, जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पापळकर यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राष्ट्रीय सूचना केंद्रात पुरवणी बॅलेट युनिट प्रथमस्तरीय सरमिसळ प्रक्रिया संगणक प्रणालीद्वारे पूर्ण करण्यात आली. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, उपजिल्हाधिकारी समाधान घुटुकडे, जिल्हा विज्ञान व सूचना अधिकारी अब्दुल बारी तसेच राजकीय पक्षाचे प्रतिनिधी सर्वश्री विजय गाभणे, दशरथ लकडे, विनोद हमणे, गोपाल सारडा आदी उपस्थित होते.




भारत निवडणूक आयोगातर्फे विकसित संगणक प्रणालीमध्ये सर्व प्रकारच्या पुरवणी बॅलेट युनिटची नोंद घेऊन मतदारसंघनिहाय वितरित करण्यात येते.

जिल्ह्यातील एकूण तीन विधानसभा मतदारसंघ हिंगोली येथे ३४३, कळमनुरी येथे ३४६ व वसमत येथे ३२८ मतदान केंद्र आहेत. या एकूण १०१७ मतदान केंद्रांकरिता ९२- वसमत विधानसभा मतदार संघासाठी ८०२ बॅलेट युनिट, ९३- कळमनुरी विधानसभा मतदार संघासाठी ८९० व ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघासाठी ८८० बॅलेट युनिट वितरीत करण्यात आले आहेत.

यानंतर संबंधीत विधानसभा मतदार क्षेत्रात कोणत्या मतदान केंद्रावर कोणते मतदान यंत्र जाईल, हे निश्चित करण्यासाठी पुन्हा एकदा मतदान यंत्रांच्या सरमिसळीची प्रक्रिया पार पाडेल, अशी माहिती यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना दिली.

# केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे दोन दिवशीय प्रशिक्षण पूर्ण



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे दोन दिवशीय प्रशिक्षण सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे व तहसीलदार आर. यु. सुरडकर, तहसीलदार सिद्धेश्वर वरणगावकर, मंडळ अधिकारी संजय वाघमारे यांच्या उपस्थितीत आज गोपिका सिताराम गावंडे महाविद्यालय ढाणकी रोड उमरखेड येथे पार पडले. मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना क्षपवीप ढीरळपळपस व कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट, व्हीव्हीपॅड हाताळणी, व कंट्रोल युनिट, हाताळणी प्रशिक्षणाच्या माध्यमातून सर्व बाबीची माहिती देण्यात आली. संकलन केंद्रावर निवडणूक साहित्य आणि तपासणीबाबत माहिती देण्यात आली. या निवडणुकीमध्ये महत्त्वाचे बदल झालेले, टपाली मतदान, ८५ वर्षावरील ज्येष्ठ, दिव्यांग मतदार तसेच अत्यावश्यक सेवेतील मतदार आणि निवडणूक कर्तव्यावर असलेले अधिकारी-कर्मचारी यांच्या मतदानाबाबत प्रशिक्षण देण्यात आले. तसेच सी व्हीजील प, मतदारांना नो युवर कँडीडेट यासह विविध पची माहिती देण्यात आली.

# मोदी सत्तेत आल्यावर विधानसभेवर परिणाम होणार-प्रफुल्ल पटेल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मोदी प्रचंड बहुमताने देशाचे सत्तेवर पुन्हा आल्यानंतर त्याचे परिणाम महाराष्ट्राच्या विधानसभेवर होणारच आहेत. त्यावेळी आमचे दार उघडे आहेत असे सूचक विधान राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी केले आहे. सध्याच्या राजकीय परिस्थितीवर प्रफुल पटेल यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलतांना अनेक मोठे गौप्यस्फोट केले आहेत.यावेळी बोलतांना ते म्हणाले, ''एकदा मोदी प्रचंड बहुमताने देशाच्या सत्तेवर पुन्हा आल्यानंतर त्याचे परिणाम महाराष्ट्राच्या विधानसभेवर होणारच आहे. त्यावेळी पाहू आमच्यासोबत यायला कोण तयार होते. राजकारणात दार उघडे ठेवावेच लागतात आणि आमचे दार उघडे आहे. तेव्हा कोणी येऊ इच्छित असेल तर जरूर विचार करता येईल त्याला सन्मानाने आम्ही आमच्यात सामील करून घेऊ'', असे पटेल म्हणालेत.दरम्यान, ''२०१४ मध्ये आम्ही भाजपला पाठिंबा दिला होता. २०१७ मध्ये परत तसे प्रयत्न झाले. २०१९ मध्ये तर अजित पवारांनी फडणवीसांसोबत शपथ देखील घेतली होती.

# आचारसंहितेचे पालन करताना जाणून घ्या- 'काय करावे' आणि 'काय करू नये'

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । प्रतिनिधी**

: लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका २०२४ जाहीर होऊन प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. न्याय्य आणि नि:पक्षपाती वातावरणात निवडणुका पार पडाव्यात यासाठी भारत निवडणूक आयोगाने काही नियम ठरवून दिले आहेत. या नियमांनाच 'आचारसंहिता' म्हटले जाते. निवडणूक घोषित झाल्यापासून सर्वच राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी या आचारसंहितेचे पालन करणे अनिवार्य असल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी दिली आहे.

आचारसंहिता अधिक विस्तृत असल्याने त्यापैकी निवडणूक काळात राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी 'काय करावे' आणि 'काय करू नये' याबाबत काही महत्त्वाची तत्वे सांगितलेली आहेत. जाणून घेऊया याबाबतची माहिती.

काय करावे ?

निवडणूक घोषित होण्यापूर्वी सुरू करण्यात आलेले कार्यक्रम पुढे सुरू ठेवता येतील. पूर, अवर्षण इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी मदतीचे कार्य सुरू ठेवता येईल. मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रकमेची किंवा इतर वैद्यकीय मदत देता येईल. इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्यावरील टीका ही त्यांची धोरणे, पूर्वीची कामगिरी आणि कार्य यांच्याशीच संबंधित असावी. स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना प्रस्तावित सभांची जागा आणि वेळ याबाबत पुरेशी आगाऊ सूचना देऊन आवश्यक ती परवानगी घेतलेली असावी. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिवर्धक किंवा इतर सुविधांचा वापर करण्याची परवानगी मिळवावी आणि ते वापरण्याच्या नियमांचे पालन करावे. सभांमध्ये अडथळे आणणाऱ्या, सुव्यवस्था बिघडवणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची मदत घेण्यात यावी. मिरवणूक सुरू होण्याची तसेच संपण्याची वेळ व जागा आणि ती जिथून जाणार असेल तो मार्ग अगोदर निश्चित करून पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. सर्व कार्यकर्त्यांनी बिल्ले व ओळखपत्र ठळकपणे लावावेत आणि मतदारांना पुरविण्यात येणाऱ्या अनौपचारिक ओळखचिठ्ठया साध्या (पांढऱ्या) कागदावर असाव्यात आणि त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव असू नये.

काय करू नये ?

निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे पालन करताना राजकीय पक्ष तसेच उमेदवारांना सत्ताधारी पक्ष / शासन यांनी केलेल्या कामगिरीविषयी सरकारी राज्यकोषातील खर्चाने कोणतीही जाहिरात करण्यास प्रतिबंध आहे. उमेदवार आणि मतदानासाठी आलेला मतदार यांच्याशिवाय इतर कोणाही मंत्र्याला मतदान कक्षात किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करता येणार नाही. शासकीय काम आणि निवडणूक मोहीम/ निवडणूक प्रचार यांची सरमिसळ करू नये. इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या खाजगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टीका करू नये. वेगवेगळ्या जाती, समूह आणि धार्मिक किंवा भाषिक गट यांच्यामधील विद्यमान मतभेद वाढतील किंवा परस्पर द्वेष, तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करू नये. सर्व धर्मिय प्रार्थनास्थळ यांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे, भित्तीपत्रके, संगीत यांच्यासाठी करू नये. मतदारांना लाच देणे, दारुचे वाटप करणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण वा धाकदपटशा दाखविणे, तोतयेगिरी, मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या आत प्रचार करणे, मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या आधीच्या ४८ तासांत सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करणे यांसारख्या गोष्टींना मनाई आहे. इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी आयोजित केलेल्या सार्वजनिक सभा किंवा मिरवणुका यांच्यामध्ये कोणताही अडथळा निर्माण करू नये. तसेच त्यामुळे वाहतुकीलाही अडथळा निर्माण करू नये. ज्या ठिकाणी इतर पक्षांच्या सभा घेतल्या जात असतील अशा ठिकाणांहून मिरवणूक नेऊ नये. इतर पक्षांनी व उमेदवारांनी लावलेली भित्तीपत्रके काढून टाकू नयेत अथवा विद्रुप करू नयेत. याचबरोबर मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान कक्षाजवळ भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये.आचारसंहितेच्या या तत्त्वांचा भंग झाल्याचे नागरिकांना आढळल्यास त्यांनी सी-व्हिजील पवर ध्वनीमुद्रण, ध्वनीचित्रमुद्रण या माध्यमातून तक्रार करावी, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# लोकशाहीचे दोन शत्रू हुकूमशाही आणि माणसा माणसात भेद करणारी संस्कृती बाबासाहेबांच्या या घोषवाक्याच्या सह आळंदीत जल्लोषात मिरवणूक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीचा जल्लोष आळंदी मध्ये आज पहावयास मिळाला. आळंदीतील सिद्धार्थ ग्रुप यांच्या विशेष नियोजनात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली महू गावातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मस्थळाची प्रतिकृती मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले. लहान थोर महिला पुरुष सर्वजण डॉक्टर बाबासाहेबांच्या उपकाराचे गुणगान गात उत्साहात आनंद घेताना दिसून आले. आळंदीतील श्री भैरवनाथ महाराज चौकातून सदर मिरवणुकीला प्रारंभ झाला. लोकशाहीचे दोन शत्रू हुकुमशाही आणि माणसा माणसात भेद करणारे संस्कृती या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या घोषवाक्य ची मोठी प्रतिमा चित्ररथाला लावून महू गावातील जन्मस्थळाची आकर्षक चित्रकृती साकारण्यात आली होती. त्याचबरोबर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या मी त्या धर्माला मानतो जो धर्म समता बंधुता आणि स्वातंत्र्य देऊ शकेल याही घोषवाक्याला हायलाईट करत चित्ररथाला लावण्यात आलं होते. सकाळपासूनच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंतीचा उत्साह आळंदीमध्ये दिसून येत होता. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज मंदिराच्या भव्य प्रांगणा बाबासाहेबांच्या पुतळ्याला आभाळ वृद्धांनी पुष्पहार अर्पण करत अभिवादन केल्याचे दिसून आले आकर्षक विद्युत रोषणाई फटाक्यांची आतषबाजी आणि गाण्याचे तालावर फिरकणारे पाऊल यामुळे मनमोहक वातावरण होते. आळंदी पोलीस स्टेशनकडून तो बंदोबस्त सदर मिरवणुकीच्या अनुषंगाने करण्यात आला होता या मिरवणुकीमध्ये पुरुषांबरोबरच महिलांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग होता आणि



चौकात चौकामध्ये फटाक्यांच्या आतिश्वागिनी जल्लोषाचा आनंद व्दिगुणित होताना दिसला. आळंदीतील सिद्धार्थ ग्रुप हा विविध सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असतो तसेच सिद्धार्थ ग्रुपच्या वतीने दरवर्षी आकर्षक सजावटीचे चित्ररथ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त साकारले जातात ती परंपरा यावर्षी कायम ठेवत अक्षय आठ यांनी आकर्षक अशी चित्रकृती उभारली होती. मागील वर्षी सिद्धार्थ ग्रुप यांच्या सहयोगाने संविधानाची ताकद दाखवणाऱ्या विविध कलमांचा उल्लेख असलेला चित्र हा या मिरवणुकीचा केंद्रबिंदू होता तर यावर्षी महू गावातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मस्थळी असणाऱ्या स्मारकाची हुबेहू प्रतिकृती साखर आळंदीतील मिरवणुकीने सर्व आभाळविरुद्ध व आळंदीकर ग्रामस्थांचे लक्ष वेधले सायंकाळी पाचच्या सुमारास या मिरवणुकीला आळंदीतील श्री भैरवनाथ महाराज मंदिर चौकातून सुरुवात झाली. सदर मिरवणूक भैरवनाथ चौक लक्ष्मी माता मंदिर चौक आळंदी पोलीस स्टेशन मार्गे नगरपरिषद चौक महाद्वार चौक चावडी चौक येथून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अशा मार्गाने मार्गक्रमण झाली. भीम बांधवांच्या घराघरांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904